

ROTARY CLUB OF AMBAJOGAI CITY
25
SILVER JUBILEE
2001-2025

Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी



# सहयोग

पुस्तकांपासून करिअरपर्यंत
स्वच्छते पासून व्यक्तिमत्व
विकासापर्यंत...रोटरी सर्वत्र!!

## एप्रिल-2026

## कार्य अहवाल
०१ एप्रिल २०२६ - ३० एप्रिल २०२६

**रो.रोहिणी पाठक**
अध्यक्ष २०२५-२६

**रो.मंजुषा जोशी**
सचिव २०२५-२६

सहयोग संपादक / डायरेक्टर पब्लिक इमेज

**रो.अविनाश मुडेगांवकर**

Rotary Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# अनुक्रमाणिका


| अ.क्र. | तारीख | उपक्रमाचे नांव | पा.क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | १३/०४/२०२६ | जेंव्हा कला, सेवा आणि सृजनशिलता एकत्र येतात...'दास्तां' | |
| ०२. | १४/०४/२०२६ | Career Inclination-Test Future वेध | |
| ०३. | १६/०४/२०२६ | भुतकाळ जपूया,भविष्य घडवूया- बारव स्वच्छता संवर्धन. | |
| ०४. | १७/०४/२०२६ | ई-कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन. | |
| ०५. | १७/०४/२०२६ | मातीशी नाळ,उद्योगाची उंच भरारी-कष्टकरी हातांनी घडवली यशाची दुनियादारी | |
| ०६. | २३/०४/२०२६ | पुस्तकांशी मैत्री ज्ञान विचार आणि व्यक्तीमत्व विकासाची खरी गुरूकिल्ली. | |
| ०७. | २३/०४/२०२६ | रोटरी फॅमिलीने केला जागतिक पुस्तक दिन. | |
| ०८. | २६/०४/२०२६ | शब्दांपासून आत्मविश्वासा पर्यंत....इंग्रजीच्या माध्यमातून व्यक्तीमत्व विकासाचा नवा प्रवास | |
| ०९. | २८/०४/२०२६ | आपत्ती येण्याआधी तयारी, संकटात शांतता आणि कृतित सजगता हाच सुरक्षित भविष्याचा मंत्र. (International, Interdistrict RYLA Project) | |
| १०. | १२ व १५/०४/२०२६ | अंधमुक्त गाव मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर. | |
| ११. | २४/०४/२०२६ | प्रांतपाल व उपप्रांतपाल यांची सदिच्छा भेट. | |
| १०. | /०८/२०२५ | विकली मिटींग | |
| ११. | /०८/२०२५ | फ्लायर्स आणि बातम्या | |




# "जेव्हा कला,सेवा आणि सृर्जनशीलता एकत्र येतात, तेव्हा खरा बदल घडण्यास नक्कीच मदत होते.!"






नाटक "दास्तान" हे केवळ एक कलाकृती नसून, समाजातील वास्तव, भावना आणि परिवर्तनाची गरज यांचे प्रतिबिंब आहे. अशा नाटकांमधून समाजातील प्रश्न अधोरेखित होतात, जागरूकता निर्माण होते आणि विचारांना चालना मिळते — हेच रोटरीच्या कार्याशी सुसंगत आहे.

या नाटकामागे अमृत महाजन सर, कल्पना महाजन, दिग्दर्शक मंगेश सबनीस आणि लेखक कुलकर्णी सर यांचे मोलाचे योगदान आहे. विशेष म्हणजे, ही संपूर्ण टीम आपल्या अंबाजोगाईचीच आहे, ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. स्थानिक कलाकारांच्या या सर्जनशील प्रयत्नातून "Community Economic Development" आणि "Basic Education & Awareness" या रोटरीच्या उद्दिष्टांना बळ मिळालेले आहे."End Polio Now" मोहिमेअंतर्गत आयोजित केलेला Charity Show आहे. या उपक्रमातून उभारला जाणारा निधी समाजोपयोगी प्रकल्पांसाठी वापरण्यात येणार आहे. म्हणजेच, आपण आज केवळ एक नाटक पाहत नाही, तर समाजाच्या उन्नतीसाठी एक महत्त्वाचे योगदान देत आहोत.

कला ही समाजपरिवर्तनाची शक्ती आहे , ती विचार घडवते, संवेदना जागृत करते आणि कृतीस प्रेरित करते.

# "भविष्यातील पिढीसाठी रोटरीचा पुढाकार

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त आयोजित Career Inclination Test."

एका दिवसात 150 विद्यार्थ्यांना लाभ! रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीचा उपक्रम डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ते समर्पित! या उपक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी, क्षमता व योग्य करिअर क्षेत्र याबाबत मार्गदर्शन करणे तसेच त्यावर समुपदेशन सत्र घेणे,हा होता.

या उपक्रमात 150 इयत्ता 8वी ते 12वी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मागील तीन दिवसांपासून सहभाग नोंदविला. सर्व विद्यार्थ्यांची Career Inclination Test घेऊन त्यांचे सविस्तर रिपोर्ट तयार करण्यात आले.

प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक रिपोर्ट कार्ड देण्यात आले.विद्यार्थ्यांना रिपोर्ट वितरण करण्यात आले या प्रसंगी, रोटरी क्लबच्या अध्यक्षा Rtn. Rohini Pathak यांनी विद्यार्थ्यांना Career Counselling चे महत्त्व Career Inclination Test चे फायदे

याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले . भविष्यातील निर्णायक क्षमता वाढण्यास मदत होते यावर सांगितले तसेच, प्रकल्प प्रमुख व Computer World Institute चे संचालक Santosh Mohite यांनी विद्यार्थ्यांना संपूर्ण प्रक्रियेचे मार्गदर्शन करिअर निवडीसंबंधी दिशा देत त्यांना प्रोत्साहित केले.





Rotary Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी आणि ब्राह्मण ऐक्य परिषद, शाखा अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने श्री परशुराम जन्मोत्सव निमित्त दिनांक 16 एप्रिल 2026 रोजी सकाळी 7.00 वाजता, अंबाजोगाई येथील दासोपंत महाराज समाधी परिसरातील ऐतिहासिक बारव (कुंड) येथे स्वच्छता व संवर्धन मोहीम उत्साहात व यशस्वीरित्या राबविण्यात आली.ही ऐतिहासिक बारव अंबाजोगाईच्या समृद्ध सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वारशाचे प्रतीक असून, तिचे जतन व संवर्धन करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे, या भावनेतून हा उपक्रम हाती घेण्यात आला. या मोहिमेद्वारे स्वच्छतेसोबतच वारसा जतनाबाबत जनजागृती करण्याचाही संदेश देण्यात आला.या उपक्रमात बारव परिसरातील कचरा, सुकलेली पाने, गवत व साचलेली घाण साफ करण्यात आली. तसेच परिसरातील नरसिंह मंदिर, महादेव मंदिर व मोकळा परिसर यांचीही स्वच्छता करण्यात आली.

**"भूतकाळ जपूया, भविष्य घडवूया!"**





## “ई-कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन... पर्यावरण संरक्षणासाठी सामूहिक योगदान!”



अंबाजोगाई सिटी रोटरीचा ई-वेस्ट संकलन उपक्रम; पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांचा उत्स्फूर्त सहभागRotary Club of Ambajogai City तसेच Rotaract Club of Ambajogai City यांच्या संयुक्त विद्यमाने “Unite for Good” या थीम अंतर्गत ई-वेस्ट जनजागृती व संकलन अभियान यशस्वीरित्या राबविण्यात आले. पर्यावरण संरक्षण, इलेक्ट्रॉनिक कचऱ्याची सुरक्षित विल्हेवाट आणि नागरिकांमध्ये पर्यावरणपूरक सवयी निर्माण करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला.या अभियानादरम्यान अनेक जागरूक नागरिकांनी जुने व वापरात नसलेले मोबाईल फोन, खराब इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वायर, चार्जर्स, संगणकाचे पार्ट्स, की-बोर्ड, लॅपटॉप, इलेक्ट्रॉनिक घड्याळे तसेच इतर लहान इलेक्ट्रॉनिक वस्तू जमा करून उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.संकलित करण्यात आलेला संपूर्ण ई-कचरा अधिकृत ई-वेस्ट व्यवस्थापन संस्था Chousalkar Industries यांच्याकडे अधिकृतरित्या सुपूर्द करण्यात आला. या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली, इलेक्ट्रॉनिक कचऱ्याची जबाबदारीने विल्हेवाट लावण्याचा संदेश पोहोचला तसेच ई-कचऱ्यामुळे निसर्गावर होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांना बळ मिळाले.

# मातीशी नाळ उद्योगाची उंच भरारी कष्टकरी हातांनी घडवली यशाची दुनियादारी

कुंबेफळ येथे प्रगतीशील शेतकरी व उद्योजकांच्या यशोगाथेची प्रेरणादायी भेटRotary Club of Ambajogai City ची विकली मीटिंग क्रमांक ४१ ही आगळ्या-वेगळ्या पद्धतीने कुंबेफळ येथे "वेटकिंग पशुखाद्य इंडस्ट्री" आणि "वेटकिंग डेअरी फार्म" येथे प्रत्यक्ष उद्योग भेटीच्या माध्यमातून उत्साहात पार पडली.या भेटीदरम्यान प्रगतशील शेतकरी व उद्योजक निवृत्ती जनार्धन तोडकर तसेच त्यांचे बंधू कृष्णा जनार्धन तोडकर यांच्या यशस्वी प्रवासाची माहिती प्रत्यक्ष मुलाखतीतून जाणून घेण्यात आली. ऑरगॅनिक शेतीसोबत दुग्ध व्यवसाय उभारण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, आलेली आव्हाने आणि मिळवलेले यश ऐकून सर्व रोटेरियन सदस्य प्रेरित झाले. ग्रामीण भागातील अशा कष्टकरी आणि प्रगतीशील शेतकऱ्यांचे कार्य समाजासाठी आदर्श असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. या प्रसंगी रोटरीचे उपाध्यक्ष धनराज सोळंकी, सहसचिव राधेश्याम लोहिया, पब्लिक इमेज डायरेक्टर अविनाश मुडेगावकर, स्केल ग्रँट प्रोजेक्ट क्लब डायरेक्टर अनिल केंद्रे आदि सदस्य उपस्थित होते.










आज कुंबेफळ इथे "वेटकिंग पशुखाद्य इंडस्ट्री", तसेच "वेटकिंग डेअरी फॉर्म " इथे भेट देण्यात आली . शेतकरी ऑरगॅनिक शेती प्रशिक्षण येथील प्रशिक्षणार्थी निवृत्ती जनार्दन तोडकर आणि बंधू कृष्णा जनार्दन तोडकर यांची आज परिवारासह मुलाखत घेण्यात आली.





Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# “पुस्तकांशी मैत्री... ज्ञान, विचार आणि व्यक्तिमत्त्व विकासाची खरी गुरुकिल्ली!”

अंबाजोगाई सिटी रोटरीकडून जागतिक पुस्तक दिनानिमित्त सामूहिक वाचन उपक्रमजागतिक पुस्तक दिनानिमित्त Rotary Club of Ambajogai City यांच्या वतीने स्वामी विवेकानंद बालविद्या मंदिर, अंबाजोगाई येथे इंटरॅक्ट क्लब अंतर्गत सामूहिक वाचन उपक्रम उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत मनपूर्वक वाचनाचा आनंद अनुभवला.या प्रसंगी क्लब अध्यक्षा रोहिणी पाठक यांनी “पुस्तके ही माणसाची खरी मित्र असून वाचनामुळे ज्ञान, आत्मविश्वास आणि व्यक्तिमत्त्व विकास साध्य होतो,” असे मार्गदर्शन केले.या उपक्रमाचे नियोजन स्वरूपा कुलकर्णी, अविनाश मुडेगावकर, व अमृत महाजन यांनी केले. शिक्षकवृंद व रोटरी सदस्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.“वाचनाची सवय लावूया... ज्ञानाचा दीप प्रत्येक मनात पेटवूया!”








# रोटरी फॅमिलीने साजरा केला जागतिक पुस्तक दिन...

जागतिक पुस्तक दिनाच्या खूप खूप शुभेच्छा आणि म्हणूनच आपण रोटरी सदस्य आपल्या घरातील परिवारामध्ये असे एक नाविन्यपूर्ण उपक्रम नक्कीच राबवू शकतो ज्यामुळे मुलांना पुस्तक वाचण्याची आवड निर्माण होईल...!!

* Book Reading Happy Family Compaign!!

* On occasion of World Book Day तुम्ही पण आपल्या घरात ,आपल्या लहानग्यांसाठी , मुले अथवा नातवंडे, यांच्यासोबत रोज किंवा दर सुट्टीच्या दिवशी त्यांच्या समवेत एखादे पुस्तक वाचण्याची त्यांना सवय लावू शकता अणि खऱ्या अर्थाने mobile पासून दूर जाण्यासाठी त्यांना मदत करू शकता....

"वाचन म्हणजे त्यांच्या विचारांना पंख देणे होय"



Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# “शब्दांपासून आत्मविश्वासापर्यंत... इंग्लिशच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकासाचा नवा प्रवास!”

अंबाजोगाई सिटी रोटरीतर्फे मोफत स्पोकन इंग्लिश कोर्सचा प्रेरणादायी समारोप रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व देशमुख कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दहा दिवसीय मोफत स्पोकन इंग्लिश कोर्स चा समारोप समारंभ उत्साहात संपन्न झाला.या प्रसंगी क्लब अध्यक्षा रोहिणी पाठक यांनी विद्यार्थ्यांना स्वप्नांचा पाठलाग, आत्मविश्वासाने इंग्लिश बोलण्याचा सराव, वाचनाची सवय आणि व्यक्तिमत्त्व विकास याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. संजीवन देशमुख यांनी कोर्सची उद्दिष्टे स्पष्ट करत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग, आत्मविश्वास वाढवणारे मार्गदर्शन आणि सकारात्मक दृष्टिकोनामुळे हा उपक्रम अत्यंत यशस्वी ठरला.“इंग्लिश ही फक्त भाषा नाही. ती आत्मविश्वास, संधी आणि यशाकडे नेणारी वाट आहे!”





## “आपत्ती येण्याआधी तयारी, संकटात शांतता आणि कृतीत सजगता... हाच सुरक्षित भविष्याचा खरा मंत्र!”

“संकटांना घाबरायचे नाही... सज्जतेने, ज्ञानाने आणि आत्मविश्वासाने सामोरे जायचे!” लवचिक मन, सुरक्षित कृती आणि जागतिक सहकार्यातून घडवूया सक्षम, सजग आणि सुरक्षित नवी पिढी. Women in Rotary International (WIRI) यांच्या वतीने जमशेदपूर येथे “आपत्ती लवचिकता आणि शाश्वतता” या विषयावर आंतरराष्ट्रीय हायब्रिड सेमिनार यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला. या प्रभावी उपक्रमात ६०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.सेमिनारमध्ये मानसिक लवचिकता, विजेपासून सुरक्षितता, रस्ते सुरक्षा, प्रथमोपचार व CPR यांसारख्या जीवनावश्यक विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन व प्रात्यक्षिके दिली. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये संकट व्यवस्थापन, मानसिक तयारी आणि सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करणारा ठरला.या जागतिक उपक्रमात Rotary Club of Ambajogai City सह विविध आंतरराष्ट्रीय रोटरी क्लबांनी सह-यजमान म्हणून सहभाग नोंदवत “सीमांच्या पलीकडे जाऊन सुरक्षित भविष्य घडविण्याचा” संदेश दिला.






# मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न






रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी आणि आनंदऋषी नेत्रालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने दर महिन्याच्या दुसऱ्या रविवारी आयोजित करण्यात येणाऱ्या मासिक मोफत नेत्र तपासणी व अल्पदरातील मोतीबिंदू शस्त्रक्रिया प्रकल्पांतर्गत शिबिर क्रमांक १० रविवार दिनांक 12 व 15 एप्रिल २०२६ रोजी रोटरी कार्यालय, अंबाजोगाई येथे उत्साहात पार पडले. या शिबिरामध्ये एकूण 75 रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीअंती १४ रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची आवश्यकता असल्याचे निदान झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी आनंदऋषी नेत्रालय, अहिल्यानगर येथे पाठविण्यात येणार आहे. तसेच 20 रुग्णांना चष्म्याचा सल्ला देण्यात आला व 28 रुग्णांना प्रगत नेत्रशस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला. दर महिन्याला सातत्याने राबविण्यात येणारा हा उपक्रम गरजू रुग्णांसाठी अत्यंत लाभदायी ठरत असून नागरिकांकडून या सेवेला चांगला प्रतिसाद मिळत आहे.या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी निखिल सुरवसे व किरण कवाडे




# प्रांतपाल व उपप्रांतपाल यांची सदिच्छा भेट

रोटरी क्लब (3132) चे प्रांतपाल सुधीर लातूरे व उपप्रांतपाल प्रविण देशपांडे यांनी अंबाजोगाई रोटरी क्लबला भेट दिली यावेळी झालेल्या बैठकीत त्यांनी “सेवेची वाट, नेतृत्वाची साथ... रोटरीच्या ध्येयपूर्तीकडे आणखी एक भक्कम पाऊल!” रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीची विकली मीटिंग क्र. ४३ ही District Governor Visit – Pre Assembly for TRF निमित्त रोटरी कार्यालयात उत्साहात संपन्न झाली. क्लब अध्यक्षा रोहिणी पाठक यांनी बैठकीची उद्दिष्टे स्पष्ट करत क्लबच्या TRF योगदान, सदस्यसंख्या व विविध सेवा प्रकल्पांचा आढावा सादर केला. सहाय्यक राज्यपाल प्रविण देशपांडे यांनी मार्गदर्शन केले, तर जिल्हा राज्यपाल सुधीर लातूरे यांनी क्लबच्या उत्कृष्ट कार्याचे कौतुक करत 100% PHF Club होण्याचे लक्ष्य जाहीर केले. यावेळी TRF साठी विशेष योगदान देणाऱ्या सदस्यांचा गौरव करण्यात आला. प्रेरणादायी संवाद, भविष्यातील नियोजन आणि सेवाभावाची नवचेतना देणारी ही बैठक यशस्वीरीत्या पार पडली.

Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# Weekly Meeting



Rotary Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# फ्लायर्स

























